# बृहन्मुंबई महानगरपालिका

शेठ व्ही.सी.गांधी आणि एम.ए.व्होरा महानगरपालिका सर्वसाधारण रूग्णालय, राजावाडी, घाटकोपर (पू.), मुंबई – ४०००७७.

**एच.ओ./आर.जी.एच./ ३१२३ / आ-०१ दि.२२.०५.२०२३**

# सूचना

राजावाडी रूग्णालयाच्या आस्थापनेवरील "परिचारीका" या संवर्गातील १९ रिक्त पदे कंत्राटी तत्वावर भरण्याकरिता उपकार्यकारी आरोग्य अधिकारी (मुख्यालय) यांचा क्र.एच.ओ./१४१६४/एस.एन.एस. दि.२२.०९.२०२२ अन्वये मंजूरी प्राप्त झाली आहे. त्यानुसार ०९ पदे कंत्राटी तत्वावर भरण्यात आलेली आहेत. उर्वरीत १० रिक्त पदांकरीता खालील अर्हताधारक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

- **भरावयाची एकूण पदे :-** **१०**
- **मानधन :-** **रू.३०,०००/-**
- **शैक्षणिक अर्हता :-** **HSC (Science), General Nursing Midwifery 3 Years Course, MNC Registration, MS-CIT & Knowledge of Marathi & English**
- **अर्ज करण्याचा कालावधी :-** **दि.२३.०५.२०२३ ते दि.२६.०५.२०२३**
- **मुलाखतीचा दिनांक :-** **दि.०५.०६.२०२३ (सकाळी ११.०० वाजता)**

अर्जदारांनी अर्ज **दि. २३.०५.२०२३ ते दि.२६.०५.२०२३** पर्यंत कार्यालयीन वेळेत राजावाडी रूग्णालय, घाटकोपर (पूर्व) येथे सादर करावयाचे आहेत. सदर दिनांका नंतर प्राप्त झालेले अर्ज विचारत घेतले जाणार नाहीत. याची नोंद घ्यावी. (**अर्जा सोबतची कागदपत्रे साक्षांकीत केलेली असावीत**.)

सदर नियुक्ती हया एका वेळी सहा महिन्याच्या कालावधीकरिता अथवा सदर पदांवर कायम तत्वावर उमेदवार प्राप्त होईपर्यंत या पैकी जे अगोदर असेल एवढ्या कालावधीसाठी असेल. त्यांना महानगरपालिका कर्मचा-याप्रमाणे सेवेचे इतर कोणतेही फायदे अनुज्ञेय होणार नाहीत.

अटी व शर्ती सोबत जोडल्या आहेत.

*सही*

**वैद्यकीय अधिक्षक**

**राजावाडी रूग्णालय, घाटकोपर**